# शिवनेरी कुल- कार्यक्रम अहवाल

# ३ जानेवारी २०२५ - सावित्रीबाई फुले जयंती













शासकीय अध्यापक महाविद्यालय मुंबई,०१ मध्ये दिनांक 3 जानेवारी २०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजक शिवनेरी कुलाने केले होते . कार्यक्रमाची सुरुवात ११:३० वाजता करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष पद माननीय प्राचार्य-डॉ.सुविधा सरवणकर मॅडम भूषविले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री सुनील सोनवणे सर हे उपस्थित होते. तसेच प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाचे छात्र अध्यापक हे देखील उपस्थित होते.तसेच काही विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला होता . त्यात सावित्रीबाई फुले यांचा परिचय तसेच शैक्षणिक कार्य सामाजिक कार्य त्यांच्या आयुष्यातील एक प्रसंग या विषयी विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली. कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय भुवड यांनी केले.शेवटी कार्यक्रमाची सांगता मान्यवरांचे आभार प्रदर्शनातून करण्यात आली.

.

# <u>ख्रिसमस दिवस</u>


शासकीय अध्यापक महाविद्यालय
MERRY CHRISTMAS
2024/12/24 12:59


शासकीय अध्यापक महाविद्यालय
MERRY CHRISTMAS
URBAN


शासकीय अध्यापक महाविद्यालय
MERRY CHRISTMAS
2024/12/24 13:14

25 डिसेंबर  2025 रोजी डॉ .होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या,  शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत ' ख्रिसमस दिवस '  आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम शिवनेरी कुलाने आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उपस्थिती नोंदवली होती, त्याचप्रमाणे प्राध्यापक वृंदात प्राचार्य सुनील सोनवणे सर तसेच डॉ. सुनिता लोंढे यांची उपस्थिती होती.  या कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्राध्यापकांचे स्वागत त्याचप्रमाणे त्यांना  चोकलेट रुपी भेट देवून करण्यात आले होते. त्यानंतर छात्र अध्यापकांनी ख्रिसमस दिवस का साजरा करतात ? त्याचप्रमाणे  येशू ख्रिस्ता बद्दल सविस्तर माहिती  चांगल्या पद्धतीने सादर केली. त्यानंतर अध्यक्ष भाषण म्हणून प्राचार्य डॉ.सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उत्कृष्ट रीत्या छात्र अध्यापकांना ख्रिसमस दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी छात्र अध्यापकांनी एकमेकांना भेटवस्तू देऊन हा दिवस चांगला पद्धतीने साजरा  केला .

# आर्थिक गुंतवणूक साक्षरता अभियान

शासकीय अध्यापक महाविद्यालय मुंबई - ०१ या अंतर्गत दिनांक 3 जानेवारी 2025 रोजी आर्थिक गुंतवणूक साक्षरता अभियान हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉक्टर सुविद्या सरवणकर मॅडम उपस्थित होत्या. तसेच आम्हाला लाभलेले मार्गदर्शक डॉक्टर. ओंकार परब (अर्थतज) हे लाभले होते.

प्रथमता कार्यक्रमाची सुरुवात ही आम्ही अध्यक्ष मार्गदर्शक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात झाली त्यामध्ये डॉ. ओंकार परब अर्थतज्ञ या सरांनी छात्र अध्यापकांना आर्थिक गुंतवणूक साक्षरता अभियान यावर मार्गदर्शन देण्यात आले. त्यामध्ये त्यांनी छात्र अध्यापकांना शेअर मार्केट बद्दल गुंतवणूक कशी केली पाहिजे तसेच गुंतवणूक ही किती फायदेशीर आणि धोकादायक असू शकते. शेअर मार्केटचे आपल्याला पूर्णपणे नॉलेज असायला पाहिजे त्यामध्ये इंट्रोडाई यामध्ये आपण दिवसांमध्ये किती पैसे गुंतवणूक करू शकतो. किंवा एका दिवसामध्ये आपल्याला किती प्रॉफिट आणि लॉस होतं हे समजतं यामध्ये प्रॉफिट कमी आणि लॉस जास्त असतो. म्हणूनच आर्थिक गुंतवणूक ही केली पाहिजे. शेअर मार्केट बद्दल अशी महत्तवाची माहिती ओंकार परब सरांनी छात्र अध्यापकांपर्यंत पोहचवली. आर्थिक गुंतवणूक साक्षरता अभियान या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

•

# 16 ऑक्टोबर 2024- सीटेट मार्गदर्शन

16 ऑक्टोबर 2024 रोजी, वेळ- दु 2.30 वा. शासकीय अध्यापक महाविद्यालय मुंबई -01, या अंतर्गत छात्र अध्यापकांना सीटेट संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून श्री भाऊराव इदे ,यांना आमंत्रित केले होते. सर्व आजी माजी बीएड छात्र अध्यापक ,तसेच सर्व प्राध्यापक वर्ग, या कार्यशाळेत उपस्थित होते.अध्यक्ष: प्राचार्य. डॉ. सुविद्या सरवणकर माजी.विद्यार्थी संघप्रमुख डॉ. सुनीता लोंढे प्राध्यापक वृंद .डॉ. सुनील सोनवणे, डॉ. अपर्णा उबाळे, श्रीमती.नीलम फोंडके, श्रीमती.उर्मिला घोलप या कार्यक्रमाला उपस्थित होते. तसेच मार्गदर्शक श्री भाऊराव ईदे सरांनी बी एड च्या सर्व अध्यापक विद्यार्थ्यांना खूप चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले. बीएड च्या पुढे TET, CTET, TAIT या परीक्षांना सामोरे जाण्यासाठी त्या परीक्षांचा अभ्यास कशाप्रकारे केला जातो. याबद्दल सर्व माहिती सखोल पद्धतीने दिली.

त्याचबरोबर अभ्यास करताना कशा पद्धतीने विषय समजून घेऊ शकतो. प्रत्येक विषयाच्या मार्कांची रचना समजून सांगितली. श्री इदे सरांनी त्यांच्या अनुभवातून परीक्षेला सामोरे कसे जायचे हे आम्हाला पटवून दिले.कोणत्याही परीक्षेला सामोरे जाताना आपला आत्मविश्वास कमी होऊ न देता सकारात्मक विचारतेने वाटचाल करा यश तुमचेच आहे. हा उद्देश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला व त्याचे TET संदर्भातील मार्गदर्शन यशस्वीरित्या पार पाडले. या कार्यशाळेची शोभा वाढवली. व कार्यक्रम संपन्न केले.

•

# Self Introduction

- दिनांक 2 नोव्हेंबर 2024 रोजी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत गद्रे सरांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते हा कार्यक्रम कॉलेजच्या प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी आयोजित केले होते या व्याख्यानामध्ये सरांनी आम्हाला self introduction या विषयावर माहिती दिली यामध्ये स्वतःला कसे ओळखावे व स्वतः मध्ये असलेले चांगले गुण कसे जोपासावे हे सांगितले.

- तसेच त्यांचे दुसरे व्याख्यान दिनांक 12 नोव्हेंबर 2024 या दिवशी 12 : 55 मिनिटांनी आयोजित केले होते या व्याख्यानामध्ये सरांनी आम्हाला Being a teacher is a multi-faceted task या विषयावर व्याख्यान केले यात सरांनी आम्हाला एक शिक्षक एक सोबत अनेक गोष्टी कशा प्रकारे करू शकतो व शिक्षक हा multi-faceted कसा होऊ शकतो यासाठी त्याने कोणत्या गोष्टी अवलंबिल्या पाहिजेत याविषयी सरांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमाचा शेवट हा प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी त्यांचे आभार मानून केला.

-

# भूगोल दिन

- १४ जानेवारी २०२५रोजी डॉ .होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत ' भूगोल दिन आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम शिवनेरी कुलाने आयोजित केला होता तसेच कार्यक्रमाचे आयोजन भूगोल मंडळाचे प्रमुख प्रा.श्री सोनवणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उपस्थिती नोंदवली होती, त्याचप्रमाणे प्राध्यापक वृंदात प्राचार्य सुनील सोनवणे सर तसेच डॉ. सुनिता लोंढे यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाची सुरुवात प्राध्यापकांच्या शुभहस्ते करून त्यानंतर भूगोल तंत्रज्ञ डॉ. सी डी देशपांडे यांच्या स्मृतीला पुष्प अर्पण करण्यात आले त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.भूगोल मंडळाचे विद्यार्थ्यांनी या महत्त्वपूर्ण दिवसाचे महत्त्व अधोरेखित करून कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी स्वीकारली १४ जानेवारी रोजी भारतीय भूगोलशास्त्र सर डॉ. सी.डी देशपांडे यांना स्मरणार्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला भूगोल दिनाचे महत्त्व स्पष्ट करणारी भाषणे विद्यार्थ्यांनी दिली तसेच सोनवणे सरांनी भूगोल दिन स्थितीचा आढावा घेत भूगोलाचे महत्व अधोरेखित केले व कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी केलेल्या अप्रतिम सादरीकरण याबाबत त्यांचे कौतुक केल्यानंतर प्रथम वर्ष छात्र अध्यापिकांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केलीआनंदी वातावरणात आणि भूगोलाचे ज्ञान सामायिक कौतुक यांच्याद्वारे विशिष्टरित्या हा कार्यक्रम जबरदस्त यशस्वी ठरला.

# पुस्तक परीक्षण सादरीकरण स्पर्धा









# पुस्तक परीक्षण सादरीकरण स्पर्धा

दिनांक 14 जानेवारी 2025 रोजी डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत " पुस्तक परीक्षण सादरीकरण स्पर्धा" आयोजित करण्यात आले होते हा कार्यक्रम शिवनेरी कुलने आयोजित केले होता या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम ह्या होत्या तसेच पुस्तक परीक्षण प्राचार्य नीलम फोंडके ह्या मॅडम होत्या. हा कार्यक्रम सकाळी 11 वाजता सुरू करण्यात आलेला होता यात विद्यार्थ्यांने वेगवेगळे विषयाची पुस्तके घेऊन त्यांचे चांगल्या प्रकारे पुस्तक परीक्षण केले. यामध्ये प्रथम वर्ष बीएड आणि द्वितीय वर्ष बीएड या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. पुस्तकाचे परीक्षण प्राचार्य नीलम फोंडके मॅडमने चांगल्या प्रकारे केले व त्यातून प्रथम क्रमांक द्वितीय क्रमांक तृतीय क्रमांक काढला गेला व कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर प्राचार्यांच्या हस्ते त्यांना बक्षीस देण्यात आलं .

- कार्यक्रमाचा शेवट हा प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी सगळ्यांचे आभार मानून केला.

# प्रजासत्ताक दिन

- 26 जानेवारी 2025 रोजी डॉ .होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या, शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत ' प्रजासत्ताक दिन आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम शिवनेरी कुलाने आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उपस्थिती नोंदवली होती, त्याचप्रमाणे प्राध्यापक वृंदात प्राचार्य सुनील सोनवणे सर तसेच डॉ. सुनिता लोंढे यांची उपस्थिती होती.प्रजासत्ताक दिनानिमित्त आम्हाला महाविद्यालयामध्ये ठीक ८ वाजता बोलवले होते.सर्व पांढऱ्या गणवेशात तयार होऊन आले होते. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर आमच्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुविधा सरवणकर मॅडम यांनी तिरंगा ध्वज फडकावून ध्वजारोहण केले त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी झेंड्याला सलामी देऊन देशभक्ती गीत गायले. तसेच काही विद्यार्थ्यांनी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त भाषण केले. त्यानंतर मान्यवरांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना गोड खाऊ देण्यात आले. कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शनाने करण्यात आले.

# शिवजयंती १९ फेब्रुवारी २०२५












- १९ फेब्रुवारी २०२५रोजी डॉ .होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या,  शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत शिवजयंती आयोजित करण्यात आली. हा कार्यक्रम शिवनेरी कुलाने आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उपस्थिती नोंदवली होती, त्याचप्रमाणे प्राध्यापक वृंदात प्राचार्य सुनील सोनवणे सर तसेच डॉ. सुनिता लोंढे यांची उपस्थिती होती.त्या कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्राध्यापकांचे स्वागत तसेच शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात केली त्यानंतर छात्र अध्यापकांनी या दिवशी पालखी आणि लेझीम चा खेळ साजरा केला. त्याचप्रमाणे शिवजयंती निमित्त सर्व छात्र अध्यापकाने भाषणाद्वारे सविस्तर माहिती दिली. विशाळगड कुलाने पाळणा गायला,शिवनेरी कुलाने आम्ही गड्या डोंगरच राहणार.. हे गीत सादर केला,रायगड कुलाने पोवाडा गायला त्यानंतर अध्यक्ष भाषण म्हणून प्राचार्य डॉ.सुविधा सरवणकर मॅडम यांनी उत्कृष्टरित्या छात्र अध्यापकांना शिवजयंती चे महत्व व माहिती सांगितली कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शनाने झाला.

# मराठी भाषा दिन






शासकीय अध्यापक महाविद्यालय मुंबई-१
डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई ३२
शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई ०१




t of Maharashtra's
Training College

# मराठी भाषा दिन

- २७ जानेवारी२०२५रोजी डॉ .होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत मराठी भाषा दिन आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम शिवनेरी कुलाने आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उपस्थिती नोंदवली होती, त्याचप्रमाणे प्राध्यापक वृंदात प्राचार्य सुनील सोनवणे सर तसेच डॉ. सुनिता लोंढे यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्राध्यापकांचे स्वागत त्याचप्रमाणे त्यानंतर छात्र अध्यापकाने या दिवशी पालखी आणि लेझीम चा खेळ त्याचप्रमाणे मराठी दिनानिमित्त अनेक छात्र अध्यापकांनी सविस्तर माहिती चांगल्या पद्धतीने सादर केली.तसेच ओवी लावणी सादर केली काही छात्र अध्यापकाने स्वरचित काव्य गायले त्यानंतर अध्यक्ष भाषण म्हणून प्राचीन डॉ.सुविधा सरवणकर मॅडम यांनी उत्कृष्ट रित्या अध्यापकांना मराठी दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले तसेच मराठी मंडळाच्या प्रमुख डॉ. सुनीता लोंढे मॅडम यांनी सुद्धा मराठी भाषा दिनाचे महत्त्व समजावून सांगितले कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शनाने झाला.

# विज्ञान दिवस

- 28 फेब्रुवारी  2025 रोजी डॉ .होमी भाभा राज्य विद्यापीठ मुंबई च्या,  शासकीय अध्यापक महाविद्यालय अंतर्गत ' विज्ञान दिवस '  आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम शिवनेरी कुलाने आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उपस्थिती नोंदवली होती, त्याचप्रमाणे प्राध्यापक वृंदात प्राचार्य सुनील सोनवणे सर तसेच डॉ. सुनिता लोंढे यांची उपस्थिती होती.      या कार्यक्रमाची सुरुवात सर्व प्राध्यापकांचे स्वागत त्याचप्रमाणे त्यांना  विज्ञान दिनानिमित्त विविध निबंध प्रकाशन करून करण्यात आले . त्यानंतर छात्र अध्यापकांनी या दिवशी पालखी आणि लेझीम चा खेळ साजरा केला  त्याचप्रमाणे  विज्ञान दिनानिमित्त अनेक छात्र अध्यापकांनी सविस्तर माहिती  चांगल्या पद्धतीने सादर केली. त्यानंतर अध्यक्ष भाषण म्हणून प्राचार्य डॉ.सुविद्या सरवणकर मॅडम यांनी उत्कृष्ट रीत्या छात्र अध्यापकांना विज्ञान दिवसाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या शेवट आभार प्रदर्शनाने झाला.